# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

नॅक समिती तर्फे बी $^{+}$ दर्जा प्राप्त

## विद्यार्थी कल्याण विभाग

दूरध्वनी २४०३३९९, २४०३४००
कुलसचिव (का.) २४०३३३३
फॅक्स : (०२४०) २४०३११३, २४०३३३५
तार : बामुसिटी
Web Site : www.bamu.net
E-Mail : registrar@bamu.net

विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद- ४३१ ००४
(महाराष्ट्र)


संदर्भ क्र. : संविक/२००९-१०/13784-14099 दिनांक : १७.०२.२०१०

प्रति,
**प्राचार्य / प्राचार्या**
सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त शिक्षण संस्था,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

विषय : **विद्यापीठाने निर्धारित केलेल्या विविध उपक्रमांसाठी शुल्काचा एकत्रित भरणा करणे बाबत...**

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र दि. १९.११.२००८

**महोदय / महोदया,**

संदर्भिय विषयास अनुसरुन मा. कुलगुरु महोदयांचे आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, येथून पुढे कै. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण (कमवा व शिका) योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांकडून १, ३ व ५ सेमिस्टरच्या परीक्षेचे आवेदनपत्र भरतेवेळीच शुल्क आकारण्यात यावेत तसेच बहिस्थ (Repeater) विद्यार्थ्यांकडून या शुल्काची वसुली करु नये.

कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

कुलसचिव

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## नॅक समिती तर्फे बी $^{+}$ दर्जा प्राप्त

## विद्यार्थी कल्याण विभाग

दूरध्वनी २४०३३९९, २४०३४००
कुलसचिव (का.) २४०३३३३
फॅक्स : (०२४०) २४०३११३, २४०३३३५
तार : बामुसिटी
Web Site : www.bamu.net
E-Mail : registrar@bamu.net

विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद- ४३१ ००४
(महाराष्ट्र)


संदर्भ क्र. : संविक / रा.शा.व.स्प./२००९ / 25ग1-2940

दिनांक : ३१.०७.२००९

प्रति,

०१ प्राचार्य
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

०२. विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

०३. संचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र,
**उस्मानाबाद.**

विषय : **'राजर्षी शाहू महाराज वक्तृत्त्व स्पर्धा'...**

**महोदय / महोदया,**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ दरवर्षी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावर एक वक्तृत्त्व स्पर्धा आयोजित करीत असते. ही स्पर्धा पद्मश्री बाळासाहेब पाटील 'सत्यवादीकार' कोल्हापूर यांच्या देणगीतून सुरु करण्यात आली आहे. स्पर्धेत सर्व प्रथम आलेल्या पहिल्या तीन उत्कृष्ट वक्त्यास देणगीच्या व्याजातून रु. १५०/-, रु. १००/- व रु. ७५/- अशी रोख पारितोषिके व प्रमाणपत्रे दिली जातात. सदर पारितोषिकांचे वितरण दि. २३ ऑगस्ट रोजी विद्यापीठाच्या वर्धापनदिन कार्यक्रमात केले जाते.

या वर्षीही **ही स्पर्धा मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २००९ रोजी दुपारी ठीक ३.०० वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात आयोजित केलेली आहे.** भाग घेणाऱ्या स्पर्धकांचा प्रवास खर्च व दैनिक भत्ता संबंधित महाविद्यालय / विभागाने करावयाचा आहे. प्रत्येक महाविद्यालयास व विभागास एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनी असा संघ पाठविता येईल. या स्पर्धेसाठी **'शिक्षणाचे खाजगीकरण : काळाची गरज'** हा विषय ठेवण्यात आला आहे. आपल्या महाविद्यालयाच्या / विभागाच्या संघाची नावे शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २००९ पर्यंत संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग यांना मिळतील अशा बेताने पाठवावी.

उपरोक्त वक्तृत्त्व स्पर्धेस वर नमूद केलेल्या दिवशी आपले विद्यार्थी पाठवून सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

31/7/09

**संचालक,**
(विद्यार्थी कल्याण)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## : परिपत्रक :

सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, प्राध्यापक, अधिकारी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या प्राध्यापक, अधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनींचा **'सेवागौरव'** समारंभ सोमवार, **दि. ६ जुलै** २००९ रोजी दुपारी ठीक ४.०० वाजता विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद कक्षात आयोजित करण्यात आला आहे.

निवृत्त झालेल्या मान्यवरांचा सत्कार **मा. कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले** यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून करण्यात येणार आहे.

वरील सेवागौरव समारंभास आपण सर्वांनी उपस्थित राहावे.

विद्यापीठ प्रांगण,
औरंगाबाद.
संदर्भ क्र. : संविक / सेवागौरव /
२००९ / 1395-1495
दिनांक : ~~२९~~ 30 जून २००९

कुलसचिव

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.**

*(सेवागौरव समारंभ - १ फेब्रुवारी २०१०)*

# : परिपत्रक :

सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, प्राध्यापक, अधिकारी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या प्राध्यापक, अधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनींचा **'सेवागौरव'** समारंभ **सोमवार, दि. १ फेब्रुवारी** २०१० रोजी दुपारी ठीक **५**.०० वाजता विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद कक्षात आयोजित करण्यात आला आहे.

निवृत्त झालेल्या मान्यवरांचा सत्कार **मा. कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले** यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून करण्यात येणार आहे.

वरील सेवागौरव समारंभास आपण सर्वांनी उपस्थित राहावे.

विद्यापीठ प्रांगण, ♦
औरंगाबाद. ♦
संदर्भ क्र. : संविक / सेवागौरव / ♦
२०१० /13334-443 ♦
दिनांक : २५ जानेवारी २०१० ♦

**कुलसचिव**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

*(डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन - ६ डिसेंबर २००९)*

## : परिपत्रक :

सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, प्राध्यापक, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ५३ व्या महापरिनिर्वाणदिनाच्या निमित्ताने **रविवार**, दि. **६ डिसेंबर** २००९ रोजी **सकाळी ठीक** ८.०० वाजता विद्यापीठ प्रवेशद्वारापासून समता शांती पदयात्रा काढण्यात येणार आहे. ही पदयात्रा मिलिंद महाविद्यालय, मिल कॉर्नर मार्गे जावून ज्युबिली पार्क येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करुन समाप्त होईल.

तसेच विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले सभागृहात दुपारी ठीक १२.३० वाजता **मा. डॉ. सीमा साखरे, नागपूर** यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान **मा. कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले** भुषविणार आहेत.

उपरोक्त कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे.

विद्यापीठ प्रांगण,
औरंगाबाद.
संदर्भ क्र. : संविक / म.प. / २००९/9914-10013
दिनांक : २७ नोव्हेंबर २००९

कुलसचिव

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## *(मराठवाडा मुक्तिसंग्रामदिन - १७ सप्टेंबर २००९)*

## : *परिपत्रक* :

**'मराठवाडा मुक्तिसंग्रामदिन'** गुरुवार, **दि. १७ सप्टेंबर २००९** रोजी साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने १७ सप्टेंबर २००९ रोजी **सकाळी ठीक ८.३०** वाजता इतिहास वस्तूसंग्रहालयाच्या हिरवळीवर **मा. कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले** यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल.

दुपारी **४.०० वा.** महात्मा जोतिबा फुले सभागृहात विद्यापीठाच्या वतीने मराठवाडा मुक्तिसंग्रामातील थोर स्वातंत्र्यसेनानींचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच **प्राचार्य डॉ. बी. एस. ढेंगळे, नांदेड** यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी **मा कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले** हे राहतील.

उपरोक्त ध्वजारोहण व सत्कार समारंभास सर्वांनी उपस्थित राहावे.

विद्यापीठ प्रांगण, ♦
औरंगाबाद. ♦
संदर्भ क्र. : संविक / म.मु.सं.दि. / ♦
२००९ / 7337-7436 ♦
दिनांक : ८ सप्टेंबर २००९ ♦

कुलसचिव

**याची एक प्रत :**

०१. सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
०२. सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
०३. सर्व वसतिगृह अधीक्षक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
यांना देवून विनंती करण्यात येते की, त्यांनी हे परिपत्रक सर्व विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

*(नॅक समितीद्वारे बी + दर्जा प्राप्त)*

## विद्यार्थी कल्याण विभाग

दूरध्वनी : २४०३३९९, २४०३४००
(का.) : २४०३१३२
(नि.) : २३७२७७७, २३७१२८९
भ्रमणध्वनी : ९४२३४७३६६०
तार : बामुसिटी
Web Site : www.bamu.net
E-mail : dsw@bamu.net

कॅप्टन डॉ. एस.टी. गायकवाड
(एम.एस्सी., बी.एड., पीएच.डी.)
संचालक, (विद्यार्थी कल्याण)
विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद - ४३१ ००४ (महाराष्ट्र)

संदर्भ क्र. : संविक/ नामविस्तारदिन/२००९-१०/ 10812 - 11130 दिनांक ०७:१२:२००९

प्रति,
**प्राचार्य**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

विषय : **सोळावा विद्यापीठ नामविस्तारदिन साजरा करणे बाबत...**

**महोदय/महोदया,**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा **'१६ वा नामविस्तारदिन'** गुरुवार, **दि. १४ जानेवारी २०१०** रोजी येत असून महाविद्यालयस्तरावर दरवर्षी प्रमाणे या दिवशी विशेष समारंभाचे आयोजन करुन साजरा करण्यात यावा. नामविस्तारदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धेचे आयोजन, विशेष व्याख्यान आदी कार्यक्रम घेवून त्याचा अहवाल दि. २५ जानेवारी २०१० पर्यंत संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग यांच्याकडे पाठवून सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,
7/12/09
संचालक,
विद्यार्थी कल्याण विभाग

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

*(विद्यापीठ वर्धापनदिन - २३ ऑगस्ट २००९)*

## : परिपत्रक :

सर्व संलग्नीत महाविद्यालयीन प्राचार्यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, **रविवार, दि. २३ ऑगस्ट २००९** रोजी विद्यापीठाचा **५१ वा 'वर्धापनदिन'** समारंभ आहे. या समारंभात महाविद्यालयाने केलेल्या शैक्षणिक प्रगतीचा अहवाल सादर करता येतो.

आपणास विनंती करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २००८-०९ या कालावधीमधील आपल्या महाविद्यालयाने राबविलेले वैशिष्टयपूर्ण उपक्रम व केलेल्या प्रगती संबंधीचा अहवाल **गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २००९ पूर्वी पोहचेल अशा बेताने संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याकडे पाठवावा.**

तद्वत, विद्यापीठ वर्धापनदिन कार्यक्रम आपल्या महाविद्यालयात साजरा करुन त्याचा अहवाल **सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २००९** पर्यंत संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग यांच्याकडे पाठवून सहकार्य करावे.

विद्यापीठ प्रांगण,
औरंगाबाद.
संदर्भ क्र. : संविक / वि. व. दि. /
२००९ / 2941-3290
दिनांक : २९ जुलै २००९ (31)

**कुलसचिव**